# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 29.03.2025** **वार- शनिवार**

---

**संभाजी महाराज पुण्यतिथी**

महाराष्ट्राच्या जनतेला अभिमान वाटेल अशा प्रकारचे संभाजी महाराजांचं स्मारक संगमेश्वर, वढू आणि तुळापूर या ठिकाणी उभारण्याचा राज्य शासनाचा मानस असून या स्मृतीस्थाळाच्या विकासासाठी कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याचं आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. संभाजी महाराज पुण्यतिथीनिमित्त वढू तुळापूर इथं आयोजित कार्यक्रमांत ते बोलत होते. पुणे जिल्ह्यातील वढू तुळापूर इथं छत्रपती संभाजी महाराजांच्या 336 व्या पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांना आज अभिवादन करण्यात येत आहे. समाधी स्थळावर छत्रपती संभाजी महाराजांना शासकीय मानवंदना देण्यात आली. खासदार उदयनराजे भोसले, उपमुख्यमंत्री अजित पवार,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आदी मान्यवरांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या समाधीचं दर्शन घेतलं आणि महाराजांना आदरांजली अर्पण केली.

**कर्करोग लसीकरण**

बारामती तालुक्यातील ते वयोगटातील मुलींना कर्करोगावरील मोफत लसीकरण करणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली. एका लसीसाठी 2 हजार रुपये खर्च येतो. बारामती शहर, तसेच तालुक्यातील संबंधित वयोगटातील मुलींना हे लसीकरण मोफत करण्यात येईल.

**गुढीपाडवा**

गुढी पाडवा अर्थात हिंदू नववर्ष दिनाच्या निमित्तानं उद्या पुण्यात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. रामनवमी ते गुढीपाडवा या कालावधीत विविध राममंदिरं तसंच अनेक संस्था-संघटनांच्या वतीनं उत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. पुण्यातील बेडेकर गणपती मंदिर आणि संगीताचार्य पंडीत द. वि. काणेबुवा प्रतिष्ठानच्या वतीने रामनवमी महोत्सवाचे आयोजन करण्यात आलं आहे.

**पूल उद्घाटन**

पुणे विद्यापीठ चौक ते ई-स्केअर दरम्यानचा पूल येत्या एक मे पासून वाहतुकीसाठी खुला होणार असल्याचे छत्रपती शिवाजीनगरचे आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी सांगितलं. नुकत्याच संपन्न झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडलेल्या पुण्यासंदर्भातील प्रश्नांची माहिती देण्यासाठी  आयोजित पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते.

**उद्योग सुविधा कक्ष**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने औद्योगिक आणि आर्थिक गुंतवणुकीला चालना देण्यासाठी ‘उद्योग सुविधा कक्ष’ कार्यान्वित केला आहे. राज्य सरकारच्या ‘100 दिवसांचा ‘कृती आराखडा’ उपक्रमाअंतर्गत राबवण्यात येणाऱ्या ‘गुंतवणूक प्रसार कृती कार्यक्रमाचा एक भाग म्हणून ‘व्यवसाय सुलभता’ संकल्पनेवर आधारित हा कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. महानगरपालिका आणि स्थानिक उद्योगधंद्यांमध्ये समन्वय ठेवून विविध उपक्रम राबविले जाणार आहे.

**परीक्षा पे चर्चा**

परीक्षेला सामोरे जाताना विद्यार्थ्यांनी तयारी कशी करावी, करिअर कसे निवडावे यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने आज परीक्षा पे चर्चा हा विद्यार्थ्यांसाठीचा एक आगळावेगळा उपक्रम राबवण्यात आला. महापालिकेच्या क्रीडा प्रबोधिनी प्रशालेत हे चर्चासत्र पार पडले. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

**डांबर खरेदी**

पुणे महापालिकेकडून डांबर खरेदी निविदा प्रकरणात नेमकी कशाला मंजुरी दिली आहे याबाबतची तपासणी केली जाईल आणि त्यानंतर पुढील निर्णय घेतला जाईल असं पुणे महापालिकेचे आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी म्हटले आहे. महापालिकेचे माजी सभागृह नेते निलेश निकम यांनी काल काही कागदपत्रांसह महापालिकेत डांबर खरेदी घोटाळा होत असल्याचा आरोप केला होता. त्यावर प्रतिक्रिया देताना आयुक्त डॉक्टर भोसले पत्रकार परिषदेत बोलत होते.

**यशदा प्रशिक्षण कार्यक्रम**

पुण्यातील यशदाच्या ‘जमीन व्यवस्थापन उत्कृष्टता केंद्रानं प्रथमच आयोजित केलेल्या जमीन व्यवस्थापनाशी संबंधित विशेष प्रशिक्षण वर्गाला भरघोस प्रतिसाद मिळाला. ते मार्च या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये जमिनींचे अभिलेख, जमीन मोजणी, रिमोट सेंसिंग तंत्रज्ञान, जमिनीचे अभिलेख डिजिटल स्वरूपात जतन करण्याचे प्रकल्प, नोंदणी प्रक्रिया

आदीसमस्या कशा सोडवाव्यात त्यासंबंधीचे संस्थात्मक मार्ग काय आहेत यांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

**शाळा सकाळी**

वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व शाळांची वेळ सकाळच्या सत्रात करण्याचे निर्देश शिक्षण संचालक संपत सूर्यवंशी आणि शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिले आहेत. त्यानुसार प्राथमिक शाळांसाठी सकाळी 7 ते 11.15 आणि माध्यमिक शाळांसाठी सकाळी 7 ते पावणेबारा अशी वेळ निश्चित केली आहे.

**हवामान**

उद्या सकाळपर्यंत हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**